**ठळक बातम्या**

- देशाच्या तिन्ही सैन्यदलांमधल्या अतुलनीय समन्वयामुळे ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ आयएनएस विक्रांतवर नौसैनिकांबरोबर साजरी केली दिवाळी

- दिवाळीच्या सणाचा सर्वत्र उत्साह

- राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत महाराष्ट्राला केंद्रसरकारकडून १ हजार ५६६ कोटी ४० लाख रुपये निधी मंजूर

**आणि**

- आशियाई रोईंग अजिंक्यपद स्पर्धेत भारताला १० पदकांची कमाई

<><><><><>

देशाच्या तिन्ही सैन्यदलांमधल्या अतुलनीय समन्वयामुळे ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. गोवा आणि कारवारच्या किनाऱ्यावर आयएनएस विक्रांत या युद्धनौकेवर नौदलाच्या जवानांसोबत प्रधानमंत्र्यांनी दिवाळी साजरी केली, त्यावेळी ते बोलत होते. आयएनएस विक्रांत ही युद्धनौका म्हणजे आत्मनिर्भर भारत आणि मेड इन इंडिया उपक्रमाचं प्रतीक आहे. ही केवळ एक युद्धनौका नाही, तर २१ शतकातल्या भारताच्या परिश्रम, प्रतिभा आणि वचनबद्धतेचंही प्रतीक आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

गेल्या दशकभरात भारतीय सेना आत्मनिर्भरतेकडे मार्गक्रमण करत आहे. या काळात ४० पेक्षा जास्त युद्धनौका आणि पाणबुड्या नौदलात दाखल झाल्या असून स्वदेशीवर भर दिला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या दशकभरात संरक्षण उत्पादनात तीनपट वाढ झाली आहे, तिन्ही सेनादलांसाठी शस्त्र आणि

उपकरणांचं उत्पादन देशातच करण्यावर भर दिला जात असून भारत शस्त्रास्त्र निर्यातीत जगातला आघाडीचा देश बनेल असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

***होल्ड... बाईट मोदी***

जवानांसोबत दिवाळी साजरी करणं आपल्यासाठी आनंदाची बाब असल्याचं सांगत प्रधानमंत्री मोदी यांनी नौदल जवानांना मिठाईचं वाटप केलं. तसंच सैन्यदलाच्या सामर्थ्याचा गौरव केला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी दिवाळीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. दीपावलीचा हा सण अंध:कारावर प्रकाशाच्या, अज्ञानावर ज्ञानाच्या आणि अर्धमावर धर्माच्या विजयाचं प्रतीक आहे. देशाच्या विविध भागांमध्ये उत्साहानं साजरा केला जाणारा हा सण प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. प्रकाशाच्या या उत्सवाने आपल्या सर्वांचं जीवन सलोखा, आनंद आणि समृद्धीने उजळून निघावं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिवाळी शुभेच्छा देताना म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही जनतेला दिवाळीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

दीपावलीचा सण सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. महाराष्ट्रात आज नरकचतुर्दशीनिमित्त घरोघरी चंद्रोदयापूर्वी अभ्यंगस्नान करुन, फटाके फोडून आणि दिवाळीचा फराळ करुन सर्वांनी सणाचा आनंद लुटला. सणानिमित्त सर्वजण एकमेकांना शुभेच्छा आणि भेटी देत आहेत. घरोघरी विविध आकारांचे आकाशकंदील आणि मनमोहक रांगोळ्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. दिवाळी पहाटेनिमित्त शास्त्रीय संगीताच्या मैफिलींचं आयोजन ठिकठिकाणी करण्यात आलं

आहे. राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फेही मुंबईत विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

लक्ष्मीपूजनानिमित्त उद्या मुंबईच्या शेअर बाजारांमधे मुहूर्ताचे सौदे दुपारी पावणे दोन ते पावणेतीन  या वेळात होणार आहेत.

राज्याच्या काही भागात दिवाळीवर पूर आणि अतिवृष्टीचं सावट आहे. त्यादृष्टीने आपद्ग्रस्तांसाठी मदतीचे उपक्रमही दिवाळीनिमित्त राबवले जात आहेत.

**<><><><>**

महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी राज्यातल्या जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

दिवाळीचा हा सण सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि प्रकाश घेऊन येवो, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या सणाच्या निमित्तानं स्वदेशीचा अंगिकार करण्याचं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**<><><><>**

२२ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या जीएसटी बचत उत्सवाचा फायदा समाजाच्या सर्व घटकांना होत आहे. आज जाणून घेऊ या जीएसटी सुधारणांमुळे घर खरेदी क्षेत्रात झालेल्या बदलांबद्दल…

***होल्ड… व्हीसी-***

*(जीएसटी प्रणालीतल्या सुधारणांमुळे घर बांधणीसाठीची सामग्री आणि पर्यायाने एकंदर खर्च कमी होऊन या क्षेत्राला मोठी चालना मिळाली आहे. सिमेंटवरचा कर २८ टक्क्यावरून १८ टक्क्यावर आल्यामुळे घरं आणि पायाभूत सुविधा उभारण्याचा खर्च कमी झाला आहे. संगमरवर आणि ग्रॅनाइटच्या ब्लॉक्सवरचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्क्यावर आला आहे. तसंच विटांवरही आता ५ टक्के जीएसटी लागत असल्यामुळे छोटी बांधकामं स्वस्त झाली*

*आहेत. या बदलांमुळे घरं खरेदी आणि पायाभूत सुविधांचा विकास अधिक परवडणारा होऊन सर्वांना घर देण्याच्या सरकारच्या उद्दिष्टाला याचा मोठा हातभार लागत आहे.)*

**<><><><><>**

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत चालू आर्थिक वर्षात केंद्र सरकारच्या वाट्याचा दुसरा हप्ता महाराष्ट्राला मंजूर झाला आहे. यामुळे यंदाच्या मान्सून काळात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं बाधित झालेल्यांना तात्काळ मदत देण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी १ हजार ५६६ कोटी ४० लाख रुपये निधी महाराष्ट्राला मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाज माध्यमावरून ही माहिती दिली. या मदतीसाठी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले. ही अग्रिम मदत असून अंतिम मदत प्राप्त करण्यासंदर्भातली प्रक्रिया अजून सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपत आहे. या टप्प्यात वीस जिल्ह्यातल्या १२२ मतदारसंघांमधे मतदान होणार असून यासाठी १ हजार ६६ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. पहिल्या टप्प्यातले उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदतही आज संपणार आहे. या टप्प्यात १२१ जागांसाठी १ हजार ३७५ उमेदवार रिंगणात आहेत.

**दरम्यान** राजद प्रणीत महाआघाडीचं जागावाटप स्पष्ट झालं आहे. राष्ट्रीय जनता दलानं आज १४३ उमेदवारांची यादी जाहीर केली. राजदकडून माजी विधानसभा अध्यक्ष अवध बिहारी चौधरी, भोजपुरी अभिनेता खेसारीलाल यादव, माजी विधानसभा अध्यक्ष उदय नारायण चौधरी हे दिग्गज रिंगणात उतरले आहेत. तर राजदचे रिषी चौधरी सिकंदरा मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढणार आहेत. काँग्रेसनेही आपल्या सहा उमेदवारांची यादी जाहीर केली असून

काँग्रेस एकूण ६० जागा लढवणार आहे. भाकप माले २०, व्हीआयपी ११, तर भाकप आणि माकप दहा पेक्षा जास्त जागांवर निवडणूक लढणार आहे. मात्र महाआघाडीतल्या घटक पक्षांमधे काही जागांवर मैत्रीपूर्ण लढत होणार आहे.

<><><><><>

व्हिएतनाम इथं झालेल्या आशियाई रोईंग म्हणजे नौका वल्हवण्याच्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं १० पदकांची कमाई केली. यात ३ सुवर्ण, ५ रौप्य आणि दोन कांस्यपदकांचा समावेश आहे. पुरुष गटात दुहेरी स्कल, चौघांच्या स्कल आणि एकेरी स्कल या प्रकारात भारताच्या खेळाडूंनी सुवर्णपदकं पटकावली.

<><><><><>

क्रिकेटमध्ये, पर्थ इथं भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं काल भारतावर ७ गडी राखून मात केली. पावसाच्या व्यत्ययामुळं सामना चार वेळा थांबवण्यात आला. वेळ कमी पडल्यामुळे सामना २६ षटकांपर्यंत मर्यादित करण्यात आला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं २६ षटकांत ९ बाद १३६ धावा केल्या. डकवर्थ-लुईस नियमानुसार ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी १३१ धावांचं लक्ष्य होतं. ते त्यांनी २२व्या षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं. या विजयामुळं तीन सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलियानं १-० अशी आघाडी घेतली आहे.

//<><><><><>//